# SPANDAN CAREER INSTITUTE

THE WAY OF SUCCESS…

**C**

**प्रश्नपुस्तिका क्र.**

**BOOKLET No.** **GS2022**

**Total Que. : 100**
**Marks : 100**
**Time : 60 min**

**Mob. No. 9923262977**


**Date :23/01/2022**

**संयुक्त (पूर्व) सराव परिक्षा - 2022**
**विषय : — सामान्य अध्ययन [003]**
**पेपर क्र. (३)**

**सूचना**

१. सदर प्रश्नपुस्तिकेत १०० अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरूवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका पर्यवेक्षकाकडून लगेच बदलू

२. आपला परीक्षा—क्रमांक हया चौकोनांत न विसरता बॉलपेनने लिहावा.




३. वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे न विसरता नमूद करावा.

४. अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला ४ पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना १,२,३ आणि ४ असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवर सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करतांना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी.

५. सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. अशा प्रकारे प्रश्न सोडविणे सोयीस्कर आहे; पण एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे. अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नाकडे परतणे सोईस्कर ठरेल.

६. उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

७. प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच “उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरापैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या **प्रत्येक चुकीच्या उत्तरांसाठी एक चतुर्थांश गुण वजा करण्यात येतील**.

**Note : Test Series Paper Online available**

**Visit us**

www.spandancareers.org

१. 'लोकपाल' ही संज्ञा पहिल्यांदा कोणी अंमलात आणली ?

१) शांती भूषण  २) डॉ. एल. एम. सिंघवी  ३) मोरारजी देसाई  ४) डॉ. हेरी मुरे

२. ६ व्या अनुसूचीमध्ये कोणत्या राज्यातील आदिवासी क्षेत्राच्या प्रशासनाबाबत तरतूदी आहेत ?

अ) आसाम  ब) मेघालय  क) मणिपूर  ड) त्रिपुरा  इ) मिझोरम

१) फक्त अ, ब, क  २) फक्त अ, ब, क, ड  ३) फक्त अ, ब, ड, इ  ४) वरील सर्व

३. खालील पर्यायामधून योग्य पर्याय निवडा ?

विधान अ – मुख्य निवडणूक आयुक्त हे राष्ट्रपतींच्या मर्जीने पद धारण करतात, कारण त्यांची नेमणूक राष्ट्रपती करतात

विधान ब – मुख्य निवडणूक आयुक्तांना केवळ सर्वोच्च न्यायाधिशाप्रमाणेच पदावरून दूर करता येते

१) फक्त अ योग्य आणि फक्त ब अयोग्य  २) फक्त विधान ब अयोग्य

३) फक्त विधान अ अयोग्य  ४) विधान अ व ब दोन्ही योग्य

४. खालील पर्यायातून योग्य पर्याय निवडा

अ) भारतात केंद्र स्तरावर संघ लोकसेवा आयोग तर राज्यस्तरावर राज्य लोकसेवा आयोग कार्यरत आहे

ब) संघ लोकसेवा आयोगाला स्वतंत्र घटनात्मक दर्जा आहे तर अशा प्रकारचा घटनात्मक दर्जा राज्य लोकसेवा आयोगाला नाही

१) फक्त अ योग्य  २) फक्त ब योग्य  ३) अ व ब दोन्ही योग्य  ४) यापैकी एकही नाही

५. खालील पर्यायातून योग्य पर्याय निवडा ?

अ) ८६ व्या घटनादुरूस्तीनुसार बालकासाठी मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची तरतूद मुलभूत हक्क म्हणून करण्यात आली

ब) भारतीय राज्यघटनेमध्ये पौढ शिक्षणाची तरतूद आहे

क) भारतीय राज्यघटनेमध्ये औपचारिक शिक्षणाची तरतूद ११ व्या अनुसूचिमध्ये आहे

ड) ८६ व्या घटनादुरूस्तीमुळे घटनेच्या मूलभूत कर्तव्य व मूलभूत अधिकार या भागामध्ये बदल करण्यात आले आहे

१) अ, ब, क योग्य  २) अ, ब, ड योग्य  ३) ब, क, ड योग्य  ४) वरील सर्व योग्य

६. लोकसभा तसेच विधानसभेत खालीलपैकी कोणाला राखीव जागा/आरक्षण प्राप्त नाही ?

अ) अनुसुचित जाती  ब) अनुसुचित जमाती  क) महिला  ड) इतर मागास वर्ग  इ) अँग्लो इंडियन

१) फक्त क, ड, इ  २) फक्त क, ड  ३) फक्त अ, ड  ४) फक्त ड, इ

७. खालील पर्यायातून योग्य पर्याय निवडा ?

अ) ७४ व्या घटनादुरूस्ती कायद्यामुळे प्रत्येक राज्यात २ प्रकारच्या नगरपालिका स्थापन करण्याची तरतूद करण्यात आली आहे

ब) या नगरपालिकांसाठी राज्य सरकार अधिसूचना काढेल

१) अ योग्य, ब अयोग्य  २) ब योग्य, अ अयोग्य  ३) अ, ब दोन्ही योग्य  ४) अ, ब दोन्ही अयोग्य

८. खालील पर्यायातून अयोग्य विधान निवडा ?

अ) राजस्थानमध्ये जिल्हाधिकारी हा जिल्हा परिषदेचा सहयोगी सदस्य असतो व त्याला मतदानाचे अधिकार असतो

ब) ७३ व्या घटनादुरूस्ती नंतर राजस्थानमध्ये जिल्हाधिकारी हा जिल्हा नियोजन समितीचा नियुक्त सदस्य असतो

क) मध्यप्रदेशमध्ये जिल्हाधिकारी हा जिल्हा नियोजन समितीचा सदस्य आणि सचिव असतो

१) अ अयोग्य  २) ब अयोग्य  ३) अ व ब दोन्ही योग्य  ४) यापैकी एकही नाही

९. गटविकास अधिकारी (B.D.O) या बाबतीत खालील पर्यायातून योग्य पर्याय निवडा

अ) बी.डी.ओ. वर जिल्हाधिकाऱ्यांचे नियंत्रण असते

ब) बी.डी.ओ. पंचायत समितीचा मुख्य कार्यकारी प्रमुख या नात्याने सर्व कार्यभार पाहतो

क) बी.डी.ओ. हा बैठकीच्या वेळी चर्चेत भाग घेतो व समान मते झाल्यास आपला निर्णायक मत देतो

१) अ, ब अयोग्य, क योग्य  २) ब, क अयोग्य, अ योग्य

३) अ, क अयोग्य, ब योग्य  ४) वरील सर्व योग्य

१०. खालील पर्यायातून योग्य पर्याय निवडा ?

अ) महापौर शहराचा प्रथम नागरिक असतो  ब) महापौर या पदाची मुदत ५ वर्षाची असते

क) उपमहापौराचा कार्यकाल अडीच वर्षाचा असतो  ड) आरक्षणाचे सर्व नियम उपमहापौरास लागू पडत नाही

१) अ, ब योग्य  २) अ, क योग्य  ३) अ, ड योग्य  ४) अ, ब, क योग्य

www.spandancareers.org

११. खालील पर्यायातून योग्य विधान निवडा

अ) लोकशाही विकेंद्रीकरणाच्या योजनेत बळवंतराय मेहता समितीने शिफारस केली की, जिल्हाधिकारी हा जिल्हा परिषदांचा अध्यक्ष असावा

ब) समुदाय विकास कार्यक्रमाच्या अंमलबजावणीमध्ये जिल्हाधिकाऱ्याला महत्वाची भूमिका देण्यात आली

क) राष्ट्रीय विस्तार योजनेअंतर्गत जिल्हाधिकाऱ्यास विकास कार्याची समन्वयाची भूमिका नाकारण्यात आली

ड) १९५५ सालापर्यंत जिल्हाधिकारी हा जिल्हयाचा मुख्य विकास आणि कल्याण अधिकारी बनला

१) अ, ब योग्य  २) अ, ड योग्य  ३) अ, ब, क योग्य  ४) अ, ब, क, ड योग्य

१२. घटनेच्या कोणत्या भागामध्ये केंद्रशासित प्रदेशांबद्दलच्या तरतूदी आहेत ?

१) भाग ६  २) भाग ७  ३) भाग ८  ४) भाग ९

१३. संसदेत आतापर्यंत (२०१६) 'पुनर्रचना आयोग कायदा' किती वेळा संमत करण्यात आला आहे ?

१) ३  २) ४  ३) ५  ४) ६

१४. पुढील योग्य पर्याय निवडा

| समिती | स्थापना वर्ष |
|---|---|
| १) बलवंतराय समिती | i) १९८६ |
| २) अशोक मेहता समिती | ii) १९६० |
| ३) वसंतराव नाईक समिती | iii) १९७७ |
| ४) एल. एम. सिंघवी समिती | iv) १९५७ |

१) i ii iii iv  २) iv i iii ii

३) iv ii iii I  ४) iv iii ii i

१५. सर्वोच्च न्यायालयातील सरन्यायाधिशांव्यतिरिक्त अन्य न्यायाधिशांची संख्या कोण निश्चित करते ?

१) सरन्यायाधिश  २) राष्ट्रपती  ३) सरन्यायाधिशाच्या सल्ल्याने राष्ट्रपती  ४) संसद

१६. भारतीय राज्यघटनेतील खालीलपैकी कोणते कलम पर्यावरणाचे संरक्षण संबंधित आहे ?

१) फक्त कलम ५१ A  २) फक्त कलम ४८ A

३) यापैकी कोणतेही नाही  ४) कलम ४८ A व कलम ५१ A दोन्ही

१७. क्रांतीकारकांची वृत्तपत्राबाबत अयोग्य जोडी ओळखा

अ) युगांतर — बारींद्र घोष

ब) गदर — लाला हरदयाळ

क) काळ — शि. म. परांजपे

ड) वंदे मातरम — मादाम भिकाई कामा

१) अ, ब  २) अ, ब, क  ३) वरील सर्व  ४) यापैकी एकही नाही

१८. कालक्रमानुसार घटनांचा क्रम असलेला अचूक पर्याय ओळखा

अ) रवींद्रनाथ टागोरांकडून सर पदवीचा त्याग  ब) म. गांधीकडून असहकार चळवळ प्रारंभ

क) खिलाफत चळवळ प्रारंभ  ड) अमृतसरमध्ये लष्करी कायदा लागू

इ) आक्रमक हालचाली रोखण्यासाठी काळा कायदा अमलात

१) ब, क, अ, ड, इ  २) इ, क, ड, अ, ब  ३) क, ड, इ, ब, अ  ४) इ, ड, अ, क, ब

१९. महात्मा गांधी यांनी दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांना न्याय मिळवून देण्यासाठी ................. मध्ये सर्वप्रथम सत्याग्रह या नव्या हत्याराचा अवलंब केला

१) १९०४  २) १९०५  ३) १९०९  ४) १९०६

२०. काँग्रेसच्या प्रथम अधिवेशनात एकूण नऊ, ठराव संमत करण्यात आलेत. त्यात पुढील कोणत्या ठरावाचा समावेश होतो ?

अ) राज्य कारभाराच्या चौकशीसाठी एक समिती नेमावी

ब) भारत मंडळ बरखास्त करणे

क) मध्यवर्ती व प्रांतीक कायदेमंडळात लोक नियुक्त सदस्य घ्यावेत

ड) सनदी सेवांची परिक्षा भारतात घ्यावी

१) ब, क, ड  २) अ, ब, क, ड  ३) अ, ब, ड  ४) क, ड

www.spandancareers.org

२१. १९३५ च्या कयद्याबाबत अयोग्य विधान कोणते ते ओळखा
१) या कायद्याने संघराज्याचे द्विगृही कायदेमंडळाची निर्मिती २) या कायद्याने प्रांतांना स्वायत्ता दिली
३) महिला, कामगार, अँग्लोइंडियन यांना स्वतंत्र मतदार संघ ४) भारतमंत्री हे पद बरखास्त

२२. अयोग्य जोडी ओळखा (ठिकाण – नेतृत्व)
१) राणी लक्ष्मीबाई – मनु तांबे २) तात्या टोपे – रामचंद्र पांडुरंग टोपे
३) नानासाहेब पेशवे – धोंडोपंत ४) बहादूरशहाजफर – बख्त खान

२३. काँग्रेसच्या आठ प्रांतातील मंत्रीमंडळानी राजीनामे दिल्यामुळे मुस्लीम लीगने कोणता दिन पाळून आनंद उत्सव साजरा केला ?
१) मुक्ती दिन २) काळा दिन ३) प्रत्यक्ष कृती दिन ४) शोक दिन

२४. मद्रास प्रांतात वंगभंग चळवळीचे नेतृत्व कोणी केले ?
१) बिपीनचंद्र पाल २) चिदंबरम पिल्ले ३) ॲनी बेझंट ४) जी.एस.अय्यर

२५. १८८० साली खालीलपैकी कोणी 'न्यू इंग्लिश स्कूल' ची स्थापना केली ?
अ) ना.म. जोशी ब) विष्णू शास्त्री चिपळूणकर क) कृष्ण शास्त्री चिपळूणकर ड) गो.ग. आगरकर
१) अ, ब, ड २) अ, ब, क ३) अ, क, ड ४) अ, ड

२६. द्विभाषिक मुंबई राज्याचे पहिले मुख्यमंत्री कोण होते ?
१) बाळासाहेब खेर २) मोरारजी देसाई ३) यशवंतराव चव्हाण ४) वसंतराव चव्हाण

२७. शाहूमहाराजांबद्दल योग्य विधाने ओळखा
अ) त्यांच्यावर महात्मा फुले यांचा प्रभाव होता
ब) त्यांनी मानगाव येथे १९२० मध्ये अस्पृश्यता परिषद भरवली
क) १९०२ मध्ये सरकारी नोकऱ्यांमध्ये ५०% राखीव जागा दिल्या
ड) मुकनायक साप्ताहिकासाठी त्यांनी आंबेडकरांना प्रोत्साहन दिले
१) अ, ब, क, ड योग्य २) अ, क, ड योग्य ३) अ, ब, ड योग्य ४) अ, ब, क योग्य

२८. वि.दा. सावरकर यांच्या संदर्भात योग्य विधान कोणते ?
अ) वि.दा. सावरकर यांच्यावर मॅझिनी या इटालियन देशभक्ताचा प्रभाव होता
ब) सावरकारांनी 'मित्र मेळा' ही संस्था स्थापन केली
क) इ.स. १९१० ला जानेवारीमध्ये ते पॅरीसला गेले
ड) ३० जानेवारी १९११ रोजी सावरकरांनी दुसऱ्यांदा पंचवीस वर्षाची जन्मपेठ ठोठावली
१) अ, ब, ड योग्य २) ब, क, ड योग्य ३) अ, क, ड योग्य ४) अ, ब, क, ड योग्य

२९. 'स्वामी रामानंद तीर्थ' यांच्याविषयी अयोग्य विधाने ओळखा.
अ) हे मुळचे हैद्राबाद संस्थानाचे निवासी नव्हते
ब) त्यांचा जन्म कर्नाटक जिल्ह्यातील विजापूर जिल्ह्यात झाला
क) त्यांचे मूळ नाव व्यंकटेश भवानराव खेडगीकर
ड) त्यांचे शिक्षण गांनगापूर, सोलापूर, अमळनेर, पुणे येथे झाले
१) अ, ब, क, ड २) फक्त अ ३) अ व ड ४) यापैकी एकही नाही

३०. स्त्रियांच्या चळवळीविषयी योग्य विधान सांगा
अ) पंडिता रमाबाईने 'शारदा सदनची' स्थापना केली ब) रमाबाई रानडे यांनी 'सेवा सदन' संस्था स्थापन केली
क) भारत महिला परिषद १९०४ मध्ये स्थापन झाली ड) ऑल इंडिया वुमेन्स १९२८ या संस्थाची स्थापना झाली
१) अ, ब योग्य २) अ, ब, क योग्य ३) अ, क, ड योग्य ४) अ, ब, ड योग्य

३१. खालील योग्य जोडया जुळवा

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १) ठक्कर बप्पा | i) कामगार हितवर्धक सभा |
| २) भिकाजी मरे | ii) मुंबईतील गिरणी कामगारांचे नेतृत्व |
| ३) श्रीपाद अमृत डांगे | iii) बोर्डी येथे आदिवासी शिक्षण प्रसार |
| ४) ताराबाई मोडक | iv) भिल्लांच्या विकासासाठी कार्य |

१) iv i ii iii २) i ii iii iv
३) iv iii ii i ४) iii ii iv i

www.spandancareers.org

३२. महाराष्ट्राच्या नकाशामध्ये अधोरेखित केलेला प्रदेश कोणत्या वनांच्या प्रकार दर्शवितो ?




१) दक्षिण उष्ण कटिबंधीय काटेरी वने
२) दक्षिण उष्ण कटिबंधातील पर्ण झडणारी वने
३) दक्षिण उष्ण कटिबंधीय पर्ण झडणारी शुष्क वने
४) सागरीय किनारी आणि भरती ओहोटीची दलदली वने

---

३३. योग्य जोडया जुळवा

| जलविद्युत प्रकल्प | जिल्हा |
|---|---|
| १) धोम | i) रायगड |
| २) भिरा | ii) पुणे |
| ३) भातसा | iii) सातारा |
| ४) पवना | iv) ठाणे |

१) i iii iv ii
२) iii ii i iv
३) i iii ii iv
४) iii i iv ii

---

३४. खालील पर्यायातून योग्य पर्याय निवडा

अ) कर्नाटक कडून महाराष्ट्राकडे जाताना रेगूर मृदेचा रंग गडद काळा होत जातो

ब) तापी नदी खोऱ्यामध्ये या मृदेची सर्वाधिक जास्त जाडी ६ मीटरपर्यंत आहे

१) फक्त अ योग्य २) फक्त ब योग्य ३) अ व ब योग्य ४) यांपैकी एकही नाही

---

३५. खाडी संबंधी खालील विधानांचा विचार करा

अ) खाडयांच्या मुखाशी त्रिभूज प्रदेश तयार होत नसल्यामुळे जहाज वहनासाठी व बंदरे विकासासाठी यांचा फार मोठा फायदा होतो

ब) सागरी लाटांच्या भरतीवेळी पाणी नदीमुखामध्ये आतापर्यंत शिरत असल्यामुळे मोठया जहाजांची ने आण करतांना निर्माण झालेल्या पाणी पातळीचा फायदा होतो

वरीलपैकी योग्य विधान ओळखा

१) फक्त अ योग्य २) फक्त ब योग्य ३) फक्त अ व ब योग्य ४) यापैकी नाही

---

३६. 'वाराणसी – कन्याकुमारी' या राष्ट्रीय महामार्गाचा क्रमांक किती आहे ?

१) ६ २) ४ ३) ७ ४) ३

---

३७. विधान (A) : हिवाळी मोसमी वारे थंड व कोरडे असतात

स्पष्टीकरण (R) : हे वारे भूप्रदेशाकडून सागराकडे वाहत असल्याने पर्जन्याचे प्रमाण अल्प असते

१) विधान (A) व (R) योग्य असून, (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण आहे
२) विधान (A) व (R) योग्य असून, (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण नाही
३) विधान (A) योग्य, (R) अयोग्य
४) विधान (A) अयोग्य, (R) योग्य

---

३८. पुढील दोन विधानांपैकी कोणते विधान योग्य आहे ते ओळखा ?

अ) महाराष्ट्राच्या पश्चिमेकडे वाहणाऱ्या नद्यांचा क्रम उत्तरेकडून दक्षिणकडे दमणगंगा, उल्हास, वैतरणा, वशिष्ठी, सावित्रि आणि कर्ली असा आहे

ब) भातसा व काळू उल्हास नदीच्या महत्वच्या उपनद्या आहेत

१) फक्त अ योग्य २) फक्त ब योग्य ३) वरील दोन्ही योग्य ४) वरील दोन्ही अयोग्य

---

३९. 'राजस्थान कालवा योजने' संदर्भात खालीलपैकी अयोग्य विधान निवडा

१) राजस्थान व पंजाबचा संयुक्त प्रकल्प
२) 'इंदिरा गांधी' कालवा हा या योजनेचाच भाग आहे
३) या योजनेत 'इंदिरा सागर' हे धरण बांधण्यात आले
४) या योजनेतून पंजाब तसेच राजस्थानच्या काही भागाला पाण्याचा लाभ झाला

---

www.spandancareers.org

४०. योग्य जोडया जुळवा

| वास्तूचे नाव | कोणी बांधली |
|---|---|
| १) पन्हाळा गड | i) कर्ण देव |
| २) महालक्ष्मी मंदीर | ii) बख्त बुलंदशाह |
| ३) कैलास लेण्या | iii) दुसरा भोज |
| ४) अंबागड (भंडारा) | iv) प्रथम कृष्ण |

१) ii i iii iv   २) iii i iv ii

३) iv i ii iii   ४) i iii iv ii

४१. सर्वाधिक वनक्षेत्र असणारे जिल्हे निवडा

अ) गडचिरोली  ब) अमरावती  क) लातूर  ड) नाशिक  इ) उस्मानाबाद

१) अ, ब व क  २) ब, क व ड  ३) अ, ब व ड  ४) अ, ब, क, ड व इ

४२. 'प्याया' (Playa) हे काय आहे ?

१) वाळवंटी प्रदेशात वाऱ्यामुळे निर्माण होणारे भूरूप

२) वाळवंटी प्रदेशात पाण्याच्या क्रियेमुळे निर्माण होणारे भूरूप

३) अशा सरोवरात क्षारांचे प्रमाण फार कमी असते

४) उत्तर आफ्रिकामध्ये प्लाया आढळतात

४३. योग्य जोडया जुळवा

| महत्वाचे उद्योग | संबंधित स्थळे/क्षेत्र |
|---|---|
| १) सायकल उद्योग | i) हैद्राबाद – बंगळुर |
| २) इलेक्ट्रॉनिक उद्योग | ii) अहमदाबाद – मुंबई |
| ३) सुती वस्त्रोद्योग | iii) हुगळी – हावडा – टिटाघर – रिश्रा |
| ४) ताग वस्त्रोद्योग | iv) मुंबई – असनमोल – सोनपत – जालंधर – दिल्ली |

१) ii i iv iii   २) iii i ii iv

३) iv i ii iii   ४) iii iv ii i

४४. कोकणात आर्द्रतेचे प्रमाण नेहमी जास्त असण्याचे कारण कोणते ?

१) जास्त पर्जन्य  २) सागर किनारा  ३) उष्णकटिबंधीय सदाहरित वने  ४) पश्चिम घाट

४५. खालील नद्यांच्या खोऱ्यांच्या क्षेत्रफळानुसार चढता क्रम लावा

अ) भीमा  ब) गोदावरी  क) कृष्णा  ड) तापी

१) क, अ, ड, ब  २) ब, ड, अ, क  ३) क, अ, ब, ड  ४) क, ड, अ, ब

४६. $1\frac{2}{3}$ चे $\div 3\frac{3}{4} \div 1\frac{1}{4} + 99\frac{48}{49} \times 245 = \cdots$

१) ४९०५  २) २४५०  ३) २४५००  ४) ४९००

४७. एका व्यापाऱ्याने १२ वह्या विकल्या तर त्याला २ वहयाच्या विक्री एवढा नफा झाला तर त्याला शेकडा नफा किती झाला ?

१) २०%  २) २५%  ३) $16\frac{2}{3}$%  ४) यापैकी एकही नाही

४८. A व B एक काम १० दिवसात करतात. B व C तेच काम १५ दिवसात करतात तर C व A तेच काम २० दिवसात करतात त्या तिघांनी ६ दिवस एकत्र काम केले व A सोडून गेला B व C ने आणखी ४ दिवस ते काम केले जर नंतर B ते काम सोडून गेला तर C ला ते काम करण्यास किती दिवस लागतील ?

१) २० दिवस  २) २५ दिवस  ३) १० दिवस  ४) १५ दिवस

४९. एका गावाची लोकसंख्या सध्या १५६२५ आहे. ती दरवर्षी ४% ने वाढ होते. तर ३ वर्षानंतर त्या गावाची लोकसंख्या किती असेल ?

१) १८०००  २) १७५७६  ३) १७६७६  ४) १६७७६

५०. २ आणि ३ वाजण्याच्या दरम्यान किती वाजता तास काटा आणि मिनिट काटा हे दोन्ही काटे परस्पर विरूध्द दिशेत असतील ?

१) २ वा. $42\frac{11}{12}$ मि  २) २ वा. $43\frac{7}{11}$ मि  ३) २ वा. $43\frac{9}{11}$ मि  ४) २ वा. $44\frac{1}{12}$ मि

www.spandancareers.org

५१. राजेशला तीन बहिणी व तीन भाऊ आहेत. कार्तिकेला दोन बहिणी व तीन भाऊ आहेत. ‘राहुल’ कार्तिकेचा भाऊ आहे व राजेशची बहिण ‘राजेश्वरी’ आहे, तर सर्वात जास्त भाऊ कोणाला आहेत ?

१) राहुल　　२) कार्तिके　　३) राजेश　　४) राजेश्वरी

---

५२. एका सांकेतिक भाषेत ‘समर’ हा शब्द ‘O□⊕’असा, ‘मदन’ हा शब्द ‘Δ⊕÷’ असा तर ‘नगर’ हा शब्द ‘O+Δ’ असा लिहितात अक्षरांच्या क्रमाप्रमाणे चिन्हांचा क्रम असेलच असे नाही. तर त्याच सांकेतिक भाषेत ‘मगर’ हा शब्द क्रमाने चिन्हात कसा लिहावा

१) +⊕O　　२) ⊕+O　　३) O⊕+　　४) ⊕O+

---

५३. एका लीप वर्षातील स्वातंत्र्यदिन शुक्रवारी असेल, तर त्याच वर्षी प्रजासत्ताक दिनी कोणता वार असेल ?

१) शनिवार　　२) शुक्रवार　　३) रविवार　　४) सोमवार

---

५४. मुलगी व आई यांच्या ५ वर्षा पूर्वीच्या वयांचे गुणोत्तर १:५ होते परंतु ५ वर्षानंतर त्यांच्या वयांचे गुणोत्तर २:५ होईल तर मुलीचे आजचे वय किती ?

१) ६ वर्षे　　२) १० वर्षे　　३) ३५ वर्षे　　४) ११ वर्षे

---

५५. सव्वा सहा वाजता घडयाळाचा मिनिट काटा व तास काटा यांच्यात किती अंशाचा कोन होईल ?

१) १०५°　　२) ९६.५°　　३) ९०°　　४) ९७.५°

---

५६. नेमबाजीच्या स्पर्धेत अचूक नेम लागल्यास ५ गुण मिळतात व नेम चुकल्यास ३ गुण कमी होतात. अमितने २० वेळा प्रयत्न केले तेव्हा त्याला एकूण ६० गुण मिळाले. तर त्याचे एकूण किती अचूक नेम लागले ?

१) १२　　२) १४　　३) १५　　४) ५

---

५७. एका सांकेतिक भाषेत ‘MACHINE’ हा शब्द ‘FOJIDBN’ असा लिहिला जातो, तर त्या भाषेत ‘WORKMAN’ हा शब्द कसा लिहिला जाईल ?

१) MDLJQNV　　२) UQTMOGP　　३) ODNJSNX　　४) OBNLSPX

---

५८. प्रश्नचिन्हांच्या जागी येणारा अंक कोणता ?

| | |
|---|---|
| २५ | |
| १३ | १९ |

| | |
|---|---|
| ६३ | |
| १७ | ४० |

| | |
|---|---|
| ? | |
| ९ | १८ |

१) ३८　　२) १५　　३) ३५　　४) २७

---

५९. सुर्योदयाकडे प्रथमेश तोंड उभा करून आहे. तो घडयाळांच्या काटयाच्या दिशेत ४५° कोनात वळला. त्यानंतर तो १३५° तून डावीकडे वळाल्यास त्याचे तोंड कोणत्या दिशेस असेल ?

१) आग्नेय　　२) दक्षिण　　३) पश्चिम　　४) उत्तर

---

६०. धावण्याच्या एका शर्यतीत अरूणच्या पुढे ५ स्पर्धक होते. रामेश्वर अरूणच्या मागे तिसरा होता आणि रामेश्वरचा शेवटून सहावा क्रमांक होता. तर शर्यतीत एकूण स्पर्धक किती ?

१) १६　　२) १४　　३) १३　　४) ११

---

६१. पुढीलपैकी कोणती जीनसत्त्वे पाण्यात विरघळणारी नाहीत ?

१) बी व सी जीवनसत्त्वे　　२) ए, बी, सी, के जीवनसत्त्वे

३) ए, डी, इ, के जीवनसत्त्वे　　४) इ, के जीवनसत्त्वे

---

६२. वनस्पतीच्या ऑक्सिश्वसन क्रियेबाबतची योग्य विधाने ओळखा

अ) या क्रियेमध्ये कार्बोहायड्रेटचे विघटन होते

ब) या क्रियेमध्ये कार्बनडाय ऑक्साइड व पाणी तयार होते

क) ही क्रिया पेशीतील तंतुकणिकामध्ये (Chondriocont) घडून येते

अ) अ व ब योग्य　　२) ब व क योग्य　　३) अ, ब व क योग्य　　४) यापैकी एकही नाही

---

६३. खालील पर्यायातून योग्य पर्याय निवडा ?

अ) वॉटर गॅस — कार्बन मोनोक्साईड : ४५% व हायड्रोजन ४५%

ब) प्रोडयुसर गॅस — कार्बन मोनोक्साईड : ३०% व नायट्रोजन : ६०%

१) फक्त विधान अ योग्य　　२) फक्त विधान ब योग्य

३) अ व ब दोन्ही योग्य　　४) दोन्ही विधाने अयोग्य

---

www.spandancareers.org

६४. योग्य जोडया जुळवा

| | |
|---|---|
| १) थॉमसन | i) निश्चित कक्षा |
| २) रूदरफोर्ड | ii) न्युट्रॉन्स |
| ३) चॅडविक | iii) विकीरण प्रयोग |
| ४) बोर | iv) इलेक्ट्रॉन्स |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | i | ii | iii | iv |
| २) | iv | iii | ii | i |
| ३) | i | iii | ii | iv |
| ४) | i | iv | iii | ii |

६५. योग्य जोडया लावा

| गट अ | गट ब |
|---|---|
| १) मलेरिया | i) फंगी |
| २) पोलिओ | ii) प्रोटोझुआ |
| ३) ॲथलिट फूट | iii) वायरस |
| ४) टायफॉईड | iv) बॅक्टेरिआ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | iii | ii | iv | I |
| २) | ii | iii | iv | i |
| ३) | ii | iii | i | iv |
| ४) | ii | i | iv | iii |

६६. पुढीलपैकी कास्थिमत्स्य प्राणी (Cartilage animals) कोणते ?

अ) शार्क ब) इलेक्ट्रीक रे क) डॉगाफिश ड) टोडा

१) फक्त अ, ब २) फक्त ब, क, ड ३) अ, ब, क ४) फक्त ड

६७. जोडया लावा (रोग – लक्षण)

| रोग | लक्षणे |
|---|---|
| १) क्षय | i) उलटया व जुलाब |
| २) हेपॅटिटीस | ii) खोकल्यावाटे रक्त |
| ३) रेबीज | iii) यकृताचा दाह |
| ४) कॉलरा | iv) घशातील स्नायू आखडणे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | i | ii | iii | iv |
| २) | iii | ii | iv | i |
| ३) | iii | iv | i | ii |
| ४) | ii | iii | iv | i |

६८. योग्य जोडया जुळवा (वर्ग उदाहरण)

| | |
|---|---|
| १) सिलेंटराटा | i) जेलिफिश |
| २) ॲनिलिडा | ii) खेकडा |
| ३) आंथोपोडा | iii) जळू |
| ४) मोलुस्का | iv) गोगलगाय |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | i | ii | iii | iv |
| २) | ii | iii | iv | i |
| ३) | i | iii | ii | iv |
| ४) | ii | iv | iii | i |

६९. १ ग्रॅम कर्बोदकापासून किती किलो कॅलरी उर्जा मिळते ?

१) ४ किलो कॅलरी २) ५.५ किलो कॅलरी ३) ९ किलो कॅलरी ४) ६ किलो कॅलरी

www.spandancareers.org

७०. इलेक्ट्रिक बल्बमध्ये टंगस्टन धातूचा वापर करतात कारण
१) टंगस्टन इतर धातुंपेक्षा स्वस्त असतो
२) टंगस्टन डयुराबल (बराच काळ टिकून राहणारे) असतो
३) टंगस्टनचा विलय बिंदू अतिउच्च आहे
४) टंगस्टन जास्त प्रकाशित होतो

---

७१. मार्श गॅसचे खालीलपैकी कोणते उपयोग आहे हे ओळखा ?
अ) घरगुरती इंधन म्हणून ब) ऊर्जानिर्मिती केंद्रामध्ये इंधन म्हणून
क) हायड्रोजनच्या उत्पादनासाठी ड) काजळी कार्बन ब्लॅक तयार करण्यासाठी
१) अ, ब, क, ड २) अ, ब, क ३) यापैकी एकही नही ४) क, ड

---

७२. खालील विधानांचा विचार करा
अ) पाण्याचे असंगत आचरण ४° से वर घडत असून यावेळी पाण्याची घनता महत्तम असते
ब) पाण्याचे तापमान ४° से पेक्षा अधिक वाढविले असता पाण्याची घनता कमी होते
१) विधान अ योग्य २) विधान ब योग्य ३) विधान अ व ब योग्य ४) विधान अ व ब अयोग्य

---

७३. हदयात दोन कार्णिका (Calyx) व दोन जवनिका (aorta) असून लोहित रक्तकणिकेत केंद्रक असते असे कोणत्या प्राणी संघात आढळते
१) मत्स्यवर्ग २) सरीसृपवर्ग ३) पक्षीवर्ग ४) सस्तनी वर्ग (mammal)

---

७४. केंद्रकीय विखंडनाबद्दलची अयोग्य विधाने शोधा
१) यांचा शोध १९३१ मध्ये ऑटोहॉन आणि स्ट्रॉसमन यांनी लावला
२) केंद्रकीय विखंडनामध्ये एखाद्या जड अणुकेंद्रकाचे दोन समान अणुकेंद्रात रूपांतर होते
३) अणुकेंद्रक विखंडनाच्या प्रक्रियेला केंद्रकीय श्रृंखला अभिक्रिया असे म्हणतात
४) युरेनियम २३५ च्या विखंडनात ०.१ टक्के वस्तूमान कमी होते

---

७५. COVAX उपक्रमाबाबत खालीलपैकी काय खरे आहे ?
अ) हा कोविडविरोधी लस संशोधनासाठीचा उपक्रम आहे.
ब) हा उपक्रम अमेरिका राबवत आहे.
क) या उपक्रमांतर्गत कोविडविरोधी लस मिळवणारा घाना हा जगातील पहिला देश आहे
१) फक्त अ २) फक्त अ, ब ३) फक्त क ४) अ, ब, क

---

७६. पोषणाविषयक जनजागृती आणि स्थानिक पातळीवर उपलब्धता, यासाठी कोणते अभियान सुरू करण्यात आले आहे ?
१) पोषण क्रांती २) आहार क्रांती ३) पौष्टिक क्रांती ४) अन्न क्रांती

---

७७. भारतीय सर्वाधिक कुपोषित मुलांची संख्या असलेले राज्य कोणते ?
१) बिहार २) उत्तर प्रदेश ३) महाराष्ट्र ४) छत्तीसगढ

---

७८. जागतिक पानथळ दिवस कधी साजरा केला जातो ?
१) १४ जानेवारी २) २ फेब्रुवारी ३) २१ मार्च ४) ९ एप्रिल

---

७९. पंतप्रधान किसान सन्मान योजनेत खालील कोणत्या राज्याच्या उत्कृष्ट अंमलबजावणीला प्रथम क्रमांक देण्यात आलेला आहे ?
१) आंध्रप्रदेश २) राजस्थान ३) मध्यप्रदेश ४) महाराष्ट्र

---

८०. 'ब्लु इकॉनॉमी कशाला म्हणतात ?
१) हवाई अर्थव्यवस्थेला २) दोन देशातील आयात व निर्यात अर्थव्यवस्थेला
३) जमीनमार्गातील अर्थव्यवस्थेला ४) सागरी अर्थव्यवस्थेला

---

८१. काजा कल्लास या खालील कोणत्या देशाच्या महिला पंतप्रधान आहेत
१) एस्टोनिया २) लिबिया ३) कझाकिस्तान ४) लाटविना

---

८२. २०२१ या वर्षाचा महाराष्ट्र भूषण हा कोणाला जाहीर करण्यात आला
१) तृप्ती बर्वे २) आशा भोसले ३) अनुराधा पौडवाल ४) वीणा देसाई

---

www.spandancareers.org

८३. अलीकडे एल साल्वाडोर हा बिटकॉईनला वैध चलन मुद्रा (Legal tender) म्हणून मान्यता देणारा जगातील पहिला देश ठरला आहे. हा देश खालीलपैकी कोणत्या प्रदेशात आहे ?

१) मध्ये अमेरिका २) दक्षिण अमेरिका ३) कॅरेबियन ४) ओशनिया

८४. लष्करी शासक, जनरल मिन आंग हलाईंग (Gen. Min. Aung Hlaing) हे कोणत्या देशाचे आहेत ?

१) उत्तर कोरिया २) म्यानमार ३) व्हिएतमान ४) लिबिया

८५. कोणत्या देशाने २०२१ मध्ये इंडियन ओशन नेव्हल सिम्पोसियम (Indian Ocean Naval Symposium : IONS) च्या ७ व्या आवृत्तीचे आयोजन केले ?

१) भारत २) फ्रान्स ३) दक्षिण आफ्रिका ४) ऑस्ट्रेलिया

८६. जुलै २०२१ मध्ये खालीलपैकी कोणत्या देशाने महिलांना एकटीने (महरम) हज यात्रा करण्याची परवानगी दिली आहे ?

१) कतार २) सौदी अरेबिया ३) इराण ४) संयुक्त अरब अमिराती

८७. आंतरराष्ट्रीय सौर आघाडीबाबत (internaional SolarAlliance) खालीलपैकी अयोग्य विधान/ने ओळखा ?

अ) ३० नोव्हेंबर २०१५ मध्ये या आघाडीचे अनावरण (Launch) करण्यात आले

ब) या आडाचीचे मुख्यालय Sardar Swaran Singh National Institute of Renewable Energy च्या कॅम्पसमध्ये आहे

क) १००० MW सौर ऊर्जा क्षमता स्थापनेचे उद्दिष्ट या आघाडीचे आहे

ड) या आघाडीच्या कराराला अनुसंमती देणारा डेन्मार्क हा पहिला बिगर–सूर्यपुत्र देश ठरला आहे

पर्यायी उत्तरे

१) फक्त ब २) फक्त क ३) फक्त ब, क ४) वरीलपैकी सर्व

८८. आंतरराष्ट्रीय सौर आघाडीचे (International Solar Alliance) नवे महासंचालक म्हणून कोणाची नियुक्ती करण्यात आली आहे ?

१) उपेंद्र त्रिपाठी २) डॉ. अजय माथूर ३) अमित खरे ४) जी.पी.सामंत

८९. ऑक्टोंबर २०२१ मध्ये झालेल्या FATF च्या बैठकीनुसार खालीलपैकी कोणत्या देशांचा समावेश राखाडी (Grey List) यादीत नाही ?

१) तुर्की २) पाकिस्तान ३) मॉरिशस ४) फिलिपाइन्स

९०. Financial Action Task Force (FATF) बाबत खालीलपैकी योग्य विधान / ने ओळखा

अ) भारत या संघटनेचा संस्थापक सदस्य आहे

ब) या संघटनेचे सचिवालय पॅरिस येथे आहे

क) फेब्रुवारी २०२० पासून या संघटनेच्या काळया यादीत इराण आणि अफगाणिस्तान हे देश आहेत

१) फक्त अ, ब २) फक्त ब ३) फक्त क ४) वरीलपैकी सर्व

९१. अण्वस्त्र प्रतिबंधक कराराबाबत (Treaty on Prohibition on Nuclear Weapons: TPNW) खालीलपैकी योग्य पर्याय निवडा

अ) अण्वस्त्रांना पूर्णपणे नष्ट करण्याचे उद्दिष्ट असणारा हा पहिला कायदेशीररित्या बंधनकारक आंतरराष्ट्रीय करार आहे

ब) या कराराव्दारे संयुक्त राष्ट्रांच्या सर्व सदस्य देशांवर देशांवर अण्वस्त्रांचा विकास, चाचणी, उत्पादन, साठा, हस्तांतरण आणि वापर करण्याबाबत बंदी घालण्यात आली आहे

पर्यायी उत्तरे

१) फक्त अ बरोबर २) फक्त ब बरोबर ३) सर्व चूक ४) सर्व बरोबर

९२. जागतिक कामगार संघटनेबाबत (ILO) खालीलपैकी चुकीचे/ची विधान/ने ओळखा ?

अ) ही संयुक्त राष्ट्रांची एकमेव त्रिपक्षीय संघटना आहे

ब) ही संयुक्त राष्ट्रांची पहिली विशेषीकृत संघटना आहे

क) अलीकडे भारताच्या अपूर्व चंद्रा यांची निवड ILO च्या आंतरराष्ट्रीय कामगार परिषदेच्या (International Labour Conference) अध्यक्षपदी करण्यात आली

ड) ILO ला १९६९ सालच्या नोबेल शांतता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले

पर्यायी उत्तरे

१) फक्त अ, ब २) फक्त क, ड ३) फक्त क ४) एकही नाही

www.spandancareers.org

९३. भारतात ........................ मोठी बंदरे आहेत तर महाराष्ट्रात एकूण ................ बंदरे आहेत

१) १२, ४९ २) १३, ४९ ३) १४, ५० ४) १३, ५०

९४. अलीकडे बातम्यांत असणारे टी.एस.तिरुमुर्ती यांची नियुक्ती खालीलपैकी कोणत्या जागतिक संघटनेवर करण्यात आली आहे ?

१) संयुक्त राष्ट्रे २) जागतिक बँक ३) आंतरराष्ट्रीय नाणे निधी ४) यापैकी नाही

९५. नोटाबाबत (NATO) खालीलपैकी योग्य विधाने दर्शवणारा पर्याय निवडा

अ) या गटाचे मुख्यालय पॅरिस येथे आहे

ब) अलीकडे तुर्की हा देश या गटाचा ३० वा सदस्य बनला आहे

१) फक्त अ २) फक्त ब ३) दोन्ही अ व ब ४) दोन्ही अ व ब नाही

९६. अ) महाराष्ट्रातील विजनिर्मितीमध्ये खाजगी क्षेत्राचा वाटा वाढत आहे

ब) महाराष्ट्रातील विजनिर्मितीमध्ये सार्वजनिक क्षेत्राचा वाटा सर्वाधिक आहे

क) महाराष्ट्रातील विजनिर्मितीमध्ये सार्वजनिक व खाजगी भागीदारी (PPP) चा वाटा कमी होत चालला आहे

अयोय विधाने ओळखा

१) फक्त अ अयोग्य २) फक्त ब अयोग्य ३) फक्त अ व ब अयोग्य ४) अ, ब, क अयोग्य

९७. जोडया जुळवा

| पंचवार्षिक योजना | साध्य वृध्दीदर |
|---|---|
| १) पहिली योजना | i) ३.३% |
| २) तिसरी योजना | ii) ४.१% |
| ३) चौथी योजना | iii) ३.६% |
| ४) दुसरी योजना | iv) २.८% |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | iii | iv | i | ii |
| २) | ii | iii | iv | i |
| ३) | iv | i | iii | ii |
| ४) | i | ii | iii | iv |

९८. २०२१–२२ सालासाठी UNSC च्या अस्थायी सदस्यपदी निवड न झालेला / ल देश ओळखा

अ) मेक्सिको ब) नॉर्वे क) आयर्लंड ड) केनिया इ) भारत ई) जिबूती

पर्याय

१) फक्त अ २) फक्त क, ड ३) फक्त ई ४) फक्त ड, ई

९९. राष्ट्रीय विकास परिषदेत खालीलपैकी कोणाचा अंतर्भाव असतो ?

अ) पंतप्रधान ब) वित्त आयोगाचे अध्यक्ष

क) केंद्रीय मंत्रीमंडळाचे सदस्य ड) राज्यांचे मुख्यमंत्री

१) अ, ब, क २) अ, ब, ड ३) ब, ड ४) वरील सर्व

१००. खालील विधानांचा विचार करा व योग्य विधाने ओळखा

अ) राष्ट्रीय उत्पन्न समितीची स्थापना ४ ऑगस्ट १९४८ ला झाली

ब) पी. सी. महालनोबिस तिचे अध्यक्ष होते

क) समितीने आपला अहवाल १९५४ मध्ये सादर केला

ड) पाहिल्या अहवालात समितीने १९४८–४९ या वर्षाचे राष्ट्रीय उत्पन्नाचे सरकारी आकडे जाहिर केले

१) अ, ब, ड योग्य २) अ, ब, क योग्य ३) ब, क, ड योग्य ४) वरील सर्व योग्य

www.spandancareers.org